प्रकरण तिसरे

# माणदेश : सर्वांगीण परिचय


| अ.क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| ३.१. : | प्रास्ताविक | ७७ ते ७७ |
| ३.२. : | 'माणदेश' : शब्दचर्चा | ७७ ते ७७ |
| ३.३. : | माणदेशाचा भूगोल | ७८ ते ८२ |
| ३.४. : | माणदेशाचा इतिहास | ८२ ते ८७ |
| ३.५. : | माणदेशी समाज आणि संस्कृती | ८७ ते ९३ |
| ३.६. : | माणदेशातील साहित्यिक आणि साहित्य | ९३ ते ९६ |
| ३.७. : | माणदेशाची इतर अंगे | ९६ ते ९९ |
| ३.८. : | माणदेशाचे प्रश्न आणि विकासाची दिशा | ९९ ते १०४ |
| ३.९. : | समारोप | १०४ ते १०४ |
| ३.१०. : | संदर्भ व टीपा | १०५ ते १०६ |

# प्रकरण तिसरे

# माणदेश : सर्वांगीण परिचय

## ३.१. प्रास्ताविक :

ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्याच्या पार्श्वभूमीवर आता तिसऱ्या प्रकरणामध्ये मी माणदेशाचा सर्वांगीण परिचय करुन देणार आहे. त्यासाठी डॉ. कृष्णा इंगोले लिखित 'माणदेश: स्वरूप आणि समस्या' (इ.स. १९८८) या ग्रंथाचा मी आधार घेणार आहे. त्यामुळे माणदेश आपणाला सर्वार्थाने समजण्यास मदत होईल. त्यात 'माणदेश शब्दचर्चा' माणदेशाचा भूगोल, माणदेशाचा इतिहास, माणदेशी समाज आणि संस्कृती, माणदेशातील साहित्यिक आणि साहित्य, माणदेशाची इतर अंगे, माणदेशाचे प्रश्न आणि विकासाच्या दिशा ह्या मुद्यांचा अंतर्भाव असणार आहे. त्यातून माणदेशाचा इतर प्रदेशापेक्षा वेगळेपणा कोणता, वैशिष्ट्ये कोणती, ह्यांचा मी शोध घेणार आहे. ह्या सर्वांमधून 'माणदेश' ही संकल्पना स्पष्ट करण्याचा माझा मानस आहे.

## ३.२. 'माणदेश' : शब्दचर्चा :

'माणदेश' ह्या नावाविषयी निश्चित पुरावा सापडत नाही. परंतु 'माणदेश' ह्या शब्दातील 'देश' हा शब्द आजच्याइतका व्यापक अर्थाने वापरला जात नसे, तर एक विशिष्ट भूभाग दर्शविण्यासाठी तो शब्द वापरला जात होता. जसा 'खानदेश' तसा 'माणदेश' हा एक होय.

'माणदेश' ह्या नावाविषयी काही शक्यता वर्तविता येतात. विशेषतः माण नदी ज्या प्रदेशातून वाहते. त्या प्रदेशाला ह्या नदीच्या नावावरून 'माणदेश' असे म्हटले जात असावे. तसेच ह्या नदीच्या परिसरात मान नावाच्या खडकाची जमीन मोठ्या प्रमाणात आढळते. त्या खडकाच्या नावावरुनही ह्या प्रदेशाला 'माणदेश' असे म्हटले जात असावे. 'माणदेश' हे नाव पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील इ. स. १२७३- ७५ च्या शिलालेखात आढळते. म्हणजेच तेराव्या शतकात 'माणदेश' हे नाव शिलालेखात अक्षरबद्ध होण्याइतके प्रचलित होते, हे सिद्ध होते. ह्याचाच अर्थ लोकमानसात ते त्याही अगोदर अस्तित्वात असावे, असा होतो. आणखी एक शक्यता अशी की, राष्ट्रकूट राजघराण्यातील सर्वांत पहिला राजा मानाङ्क ह्याने कुंतल देशात (कृष्णा खोऱ्यात) राज्य स्थापन केले. त्याची राजधानी मानपूर (सध्याच्या सातारा जिल्ह्यातील माण) ही होती. ह्या राजाचा देश म्हणून ह्या प्रदेशाला 'माणदेश' असे नाव पडले असावे.

## ३.३. माणदेशाचा भूगोल :

सर्वसाधारणपणे भीमा नदीला उजवीकडून मिळणाऱ्या माण नदीच्या खोऱ्यातील प्रदेश म्हणजे 'माणदेश' होय.[१] सह्याद्री पर्वताची एक डोंगररांग महाबळेश्वरपासून उगम पावते व ती पुढे कर्नाटकात जाते. तिला 'शंभुमहादेवाचा डोंगर' असे म्हणतात. माणदेशाच्या उगमाकडील भाग ह्या डोंगररांगेत येतो. सर्वच दृष्टीने निसर्गाची अवकृपा झालेला उजाड माळरानाचा प्रदेश म्हणूनही 'माणदेश' ओळखला जातो. साधारणपणे माण नदीला ज्या ज्या ठिकाणावरुन पाणी येऊन मिळते, त्या पाणलोट क्षेत्राचा भाग म्हणजे माणदेश, असे संबोधता येईल.

भौगोलिकदृष्ट्या माणदेश ७४ अंश, २२ मीटर व ७५ अंश ३० मीटर पूर्व रेखांशावर येतो. माणदेशाचा पूर्व-पश्चिम विस्तार ११६.८ कि.मी. असून दक्षिणोत्तर विस्तार ९१.२ कि.मी. इतका आहे. सध्या हा प्रदेश सोलापूर, सातारा, सांगली ह्या तीन जिल्ह्यांमध्ये येतो. त्यात माण व आटपाडी हे संपूर्ण तालुके येतात. तसेच सांगोले तालुक्यामधील ८१ गावे, कवठेमहंकाळ तालुक्यामधील १३ गावे, जत तालुक्यामधील ३१ गावे, मंगळवेढा तालुक्यामधील २२ गावे, पंढरपूर तालुक्यामधील १२ गावे येतात. माणदेशाचे एकूण क्षेत्रफळ ४८,७०० चौ. कि. मी. असून त्याची एकूण लोकसंख्या सुमारे १० लाख इतकी आहे.

माणदेशाची रचना बेसॉल्ट नावाच्या अग्निजन्य खडकापासून झाली आहे. माणदेशाच्या सीमा शंभूमहादेवाची मुख्य डोंगररांग व तिची उत्तरेकडील एक उपशाखा ह्यांनी मर्यादित केली आहे. ह्यात माण व भीमा खोरे हे स्थानिक उंचसखल भूरूपांनी विभागले आहे. कटफळ तलावाचा कॅनॉल व मेंढीफार्म ते सरकोलीपर्यंत निरा उजव्या कालव्याचा फाटा नं. ३ हे कालवे माणदेशाची उत्तर सीमा आहेत, असे म्हणावेसे वाटते.

माणदेशाच्या पश्चिम व दक्षिण भागात महत्त्वाची भूरूपे आढळतात. माणनदीच्या उगमाकडीत भागात काही बारमाही झरे आढळतात. तसेच आग्नेयेला महिमानगड नावाचा किल्ला आहे. महिमानगडाच्या आग्नेयेस ३१-३२ व्या मैलावरुन माण व येरळा नदीची जलविभाजक रेषा जाते. ह्या प्रदेशाच्या दक्षिणेला कुकुडवाड येथे वैशिष्ट्यपूर्ण खिंड आहे. ह्यातूनच म्हसवड-मायणी रस्ता जातो. ह्या भागात ईशान्यकडे खरसुंडीच्या सिद्धनाथाचे मंदिर आहे. पुढे नागजच्या पश्चिमेला डोंगरातून सोलापूर-कोल्हापूर रस्ता जातो. नागजपासून जलविभाजक रेषा पुढे जतपर्यंत गेली आहे. ती माणखोऱ्याची दक्षिण सीमा ठरविते. थोडक्यात, माणदेशाच्या नदीलगतचा प्रदेश वगळून इतरत्र डोंगराळ प्रदेश आढळतो.

माणदेशाचे हवामान सर्वसाधारपणे समशीतोष्ण असले, तरी उष्ण आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि कोरडे हवामान ही माणदेशाला मिळालेली देणगी आहे. कडक उन्हाळा, ऊबदार हिवाळा आणि अनिश्चित पावसाळा असे येथील ऋतुमान आहे.

माणदेशात साधारणपणे माळरान, चिकण, तांबडतोंडी, करल व काळी जमीन अशी पाच प्रकारची जमीन आढळते. शेती हाच प्रमुख व्यवसाय असलेल्या ह्या भागात सुपीक जमीन अतिशय कमी प्रमाणात आहे. कमी पाऊस, जंगलाचा अभाव, एकाच स्वरूपाची खनिजे, रासायनिक पदार्थांचे अल्प प्रमाण आणि उष्ण हवामान ह्यांचा जमिनीवर फार मोठा विपरित परिणाम होतो. माळरानाची बरीचशी जमीन पडीक आहे. तांबडतोंडी जमीन मुख्यत: जिराईत आहे. करल जमीन लागवडीखाली आहे. परंतु सवाळ (क्षारयुक्त) पाण्याचा प्रश्न आहे. चिकण जमिनीवर बागाईत शेती आहे. माणनदीकाठची काळी कसदार जमीन बागाईत आहे. पावसाळा कमी असल्यामुळे नदीला पाणी नसते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी हंगामी विहीर बागाईत आहे.

माणदेशात एकूण ४,९६,३९५ हेक्टर जमीन आहे. त्यापैकी २५,६०९ हेक्टर जमीन जंगलाखाली आहे. ३,९९,९०० हेक्टर जमीन जिराईत आहे. केवळ ३५,६४७ हेक्टर जमीन बागाईत आहे. ३९,१३६ हेक्टर जमीन शेतीलायक असतानासुद्धा पडीक आहे. जमिनीत तिच्या प्रतवारीनुसार कापूस, ज्वारी, भुईमूग, ऊस ही पिके घेतली जातात. सध्या डाळींब, बोर ही फळझाडे मोठ्या प्रमाणावर दिसतात. उथळ व हलक्या प्रतीच्या जमिनी खरीप हंगामासाठी वापरतात. त्यात बाजरी, मटकी, तूर, तीळ इ. कडधान्याची पिके घेतली जातात.

कोणत्याही शेतीचे भवितव्य पाऊसमानावर अवलंबून असते. पाण्याचा प्रश्न माणदेशाच्या विकासातील प्रमुख प्रश्न आहे. अपुरा आणि अनिश्चित पाऊस हे माणदेशाच्या दु:खाचे कारण आहे. माणदेशात सरासरी ५४० मि.मी. इतका पाऊस पडतो. जूनच्या शेवटी पावसाला सुरूवात होते. त्यावर खरिपाच्या पेरण्या करतात. पण जुलै-ऑगस्ट मध्ये पावसात खंड पडतो. हा पावसाचा खंडच शेतकऱ्यांचा कर्दनकाळ ठरतो. सप्टेंबरमध्ये मात्र ईशान्य मान्सूनचा पाऊस पडतो. माणदेशातील ६० टक्के पाऊस ह्या महिन्यात पडतो. त्यावर रब्बीच्या पेरण्या होतात. पण नंतरची उष्णता व पावसातील खंड ह्यामुळे रब्बी हंगामसुद्धा दुष्काळाच्या छायेत अडकतो. म्हणून माणदेशात सतत दुष्काळ दिसतो.

माणदेशातील 'माण' नदीत पाणी कधीकधी दिसते. वर्षातून महिना-पंधरा दिवससुद्धा माणनदी वहात नाही. माणनदीच्या १६३ कि.मी च्या प्रवासात एकही बारमाही पाण्याचा डोह

आढळत नाही. सातारा जिल्ह्यात शंभुमहादेवाच्या डोंगररांगेत कुळकजाईजवळ माणनदी उगम पावते आणि सरकोलीस (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) भीमा नदीला मिळते.

माणनदीच्या प्रवाहात वरती पाणी दिसत नसले, तरी वाळूत जमिनीखाली भरपूर पाणी आहे. कारण नदीवर पूल बांधत असताना पायात मिळालेल्या पाण्यावरुन लोकमानसात हा समज पसरला आहे. परंतु सध्या विहिरींची संख्या वाढली. पाऊसमान कमी झाले. त्यामुळे पाण्याची पातळी खोलवर गेलेली जाणवते. माणखोऱ्यात सध्या १,२०० पाझर तलाव आहेत. परंतु त्यात फार कमी वेळा पाणी दिसते.

माणनदीवर इ. स. १९५५ साली आंधळीजवळ (ता. माण, जि. सातारा) होणाऱ्या धरणाचे भूमिपूजन तत्कालीन बांधकाममंत्री कै. मालोजीराजे निबांळकर ह्यांच्या हस्ते झाले. त्यानंतर तीस वर्षात अनेक मान्यवरांच्या हस्ते फक्त भूमिपूजन झाले. पण काम मात्र झाले नाही. कारण नियोजित धरणाचे पाणलोट क्षेत्र १२५ कि.मी. आहे. त्यात माण तालुक्यातील सर्वात चांगली जमीन पाण्याखाली जाते. ह्या क्षेत्रात १७२ पाझर तलाव आहेत. परंतु ह्या धरणातून शेतीला फारसा उपयोग होईल, असे वाटत नाही.

माणनदीच्या डाव्या काठावर सातारा जिल्ह्यात 'म्हसवड' हे प्रसिद्ध शहर आहे. त्याच्या खालच्या बाजूला राजेवाडी तलाव आहे. ब्रिटिश सरकारने इ. स. १८७६-७७ मध्ये दुष्काळी काम काढून हा तलाव बांधला. ह्या तलावाचे पाणलोट क्षेत्र ४८० चौ. मैल आहे. माण तालुक्यात पडणारे सर्व पावसाचे पाणी ह्या तलावात जमा होते. आटपाडी व सांगोले ह्या दोन तालुक्यांमधील ४४०० हेक्टर क्षेत्र ह्या तलावाने हंगामी भिजते.

माणदेशातील नाझरे (ता. सांगोले, जि. सोलापूर) ह्या गावाच्या खालच्या बाजूस माणनदीस बेलवण ही नदी मिळते. गोमेवाडी, करगणी, शेटफळवरुन रामघाट नाला वहातो. ह्या रामघाट नाल्यावर बुद्धिहाळचा तलाव आहे. त्याचे पाणलोट क्षेत्र ३६५.१९ चौ. कि.मी. आहे. त्याखाली ४२०० हेक्टर जमीन हंगामी भिजते. त्याचे बांधकाम इ. स. १८९९ ला सुरू झाले व इ. स. १९६५ मध्ये पूर्ण झाले. अलीकडे हा तलाव गाळाने भरला आहे.

माणनदीला डाव्या बाजूने पहिल्यांदा मिळणारी मोठी नदी 'वाघजाई' ही होय. ह्या नदीवर राणंद (ता. दहिवडी, जि. सातारा) येथे मध्यम तलाव बांधण्यात आला आहे. आटपाडी-देशमुखवाडीच्या पूर्वेस बालतेडा नदी आहे. आटपाडी, खरसुंडी, कुमठे ही गावे ह्या नदीच्या क्षेत्रात येतात. ह्या नदीस दबुची नाला मिळतो. ह्या नाल्यावर आटपाडी तलाव आहे. माणदेशात वाटंबरे -

अकोलेवरुन वाढेगावकडे आल्यास कोरडी नदी आहे. ती वाढेगाव पासून ५६ कि.मी. वहात जाऊन उजव्या बाजूने माणनदीस मिळते. कोरडेच्या पाणलोट क्षेत्रात जवळा, शेगाव, जत ही गावे येतात.

थोडक्यात, माणनदीची जलप्रणाली वृक्षाकार आकाराची असून तिला ६२ लहान-मोठे ओहळ- नद्या मिळतात. त्यापैकी ३० प्रवाह डाव्या बाजून, तर ३२ प्रवाह उजव्या बाजूने मिळतात. हे सर्व प्रवाह हंगामी वाहणारे आहेत.

माणदेशात वनस्पती जीवन फारसे आढळत नाही. सध्याच्या हवामानात वाढणारी निंब, बाभुळ, खैर, करंज, वेडी बाभुळ इ. वृक्ष व तरवाड, नेपताड, झुडपे अशा नैसर्गिक वनस्पती आढळतात. दाट झाडी मात्र नदीच्या व ओढ्याच्या काठावर आढळते.

अलीकडे शासनाच्या धोरणानुसार काही जंगली झाडे लावण्यात आली आहेत. बाळेखिंडी, जुनोनी, डिकसळ, लोटेवाडी, म्हसवड येथे काही जमिनी जंगलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. माणदेशात फक्त ५.१५ टक्के जमीन जंगलाखाली आहे. सध्या माणदेशात वाढत असलेले फळबागांचे क्षेत्र आणि सरकारी पातळीवरील प्रयत्न हे आशेचे किरण आहेत. सध्या शासनाच्या नवीन उपक्रमानुसार निलगिरी, सुरु, अशोक, जांभुळ इ. रोपांची लागणही केली जाते. अशा रोपांच्या जमिनीचे क्षेत्र ३५.८१ चौ. कि. मी. आहे.

माणदेशात खिलारी जातीचे गायी-बैल, म्हशी, शेळ्या-मेंढ्या आणि कोंबड्या इतकेच पशुधन आढळते. येथे एकही अभयारण्य नाही. डोंगराळ भागात ससे, लांडगे, खोकडे आढळतात. महाराष्ट्रात इतरत्र न आढळणारी खिलारी जनावरे हे माणदेशाचे वैशिष्ट्य आहे. खिलारी बैल किंवा खोंड रूबाबदार असतात. खिलारी बैलांना विकताना किंमतही चांगली येते. खिलारी गायी केवळ बैलांच्या पैदाशीसाठी पाळल्या जातात.

माणदेशात धनगर मोठ्या प्रमाणात असल्याने शेळीमेंढी पालनाचा व्यवसाय परंपरेने चालत आलेला आहे. ह्यादृष्टीने इ. स. १९४२ साली सांगोले तालुक्यातील जवळे ह्या गावी संगोपनकेंद्र सुरू करण्यात आले आहे, तर इ. स. १९४६-४७ मध्ये सातारा जिल्ह्यात दहिवडी येथे प्रजनन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. अलीकडे सुधारित संकरामुळे लोकरीत सुधारणा झाल्याचे दिसते. मेंढपाळांना चाऱ्यासाठी भटकंती करावी लागते. माणदेशात २,४१,११५ मेंढ्या व १,८९,०८९ शेळ्या आहेत. मेंढपाळ कृष्णा, निरा, भीमा ह्या नद्यांच्या खोऱ्यात भटकंती करुन पशुधन जोपासतात. अलीकडे पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे व पाण्याचा प्रश्न बिकट झाल्यामुळे मेंढ्यांची जोपासना करणे अवघड झाल्याचे जाणवते. मेंढ्या मांस व लोकरीकरिता पाळण्यात येतात.

लोकरव्यापारी अशिक्षित मेंढपाळांची लुबाडणूक करतात. थोडक्यात, माणदेशाचा भूगोल असा आहे.

## ३.४. माणदेशाचा इतिहास :

माणदेशाची भौगोलिक परिस्थिती पाहिल्यानंतर माणदेशाची सध्याची स्थिती पाहण्यापूर्वी माणदेशाचा इतिहास पाहणे गरजेचे आहे. तसा माणदेशाला फार मोठा इतिहास नाही. ह्याविषयी ग. दि. माडगूळकर ह्यांनी माणदेशातील आपल्या गावाविषयी म्हटले आहे,

"तीळही नाही खेड्याला या पहिला इतिहास"
शिल्पकलेची ताम्रपटाची कशास मग आस ?
इथे न नांदे शिवशाहीचा संबंधी वंश
गर्व-सर्प या करु न शकला ओझरता दंश"[२]

त्यांचे हे वर्णन समस्त माणदेशालाही लागू पडते. तरीही जो काही थोडाफार इतिहास आहे, त्याचा परिचय आता करुन घेऊ.

माणदेश हा प्राचीन काळी दंडकारण्याचा भाग होता. महाभारतकालीन काही संदर्भ जत परिसरातील गावांना आहेत, असा एस.के. कुलकर्णी ह्यांनी दावा केला आहे.[३] परंतु ह्याला आधार नाही. वनवासात असताना सीतेला तहान लागली म्हणून राम बाण मारून पाणी काढतो, त्यातून बाणगंगा व माणगंगा नद्या निर्माण झाल्या, अशी एक आख्यायिका आहे.

प्राचीनकाळी दक्षिणेत राष्ट्रकूटांची अनेक घराणी राज्य करीत होती. त्यापैकी सर्वात जुने घराणे चौथ्या शतकात (इ.स. ३५० ते ३६०) देवराज व मानाङ्क राजाने स्थापन केले होते. त्यात मानाङ्क हा मूळ पुरुष होय. त्यांची राजधानी माणपूर ही होती.[४] सध्याचे सातारा जिल्ह्यातील 'माण' होय. मानाङ्क राजाचा मुलगा 'देवराज' (द्वितीय) ह्यांच्या नावावरुन देवापूर हे गावाला नाव मिळाले असावे.[५] ह्या घराण्याचे संबंध गुप्त व वाकाटक राजवंशाशी होते. चंद्रगुप्त (विक्रिमादित्य) ह्याने आपला राजकवी कालिदास ह्याला राष्टकुट राजाच्या दरबारी दूत म्हणून पाठविले होते. हा राजा मानाङ्काचा पुत्र देवराज असावा.

इतिहाससंशोधक वा. वि. मिराशी ह्यांच्या ह्या संशोधनावरुन काही गोष्टी लक्षात येतात, त्या पुढीलप्रमाणे : माणदेशातील प्राचीन घराणे मानाङ्काचे होते. त्याची राजधानी माणदेशात होती. कालिदासाचे पाय ह्या भूमीस लागले होते. राष्टकुट वंशातील मानाङ्कपुत्र देवराज (द्वितीय)

(४००-४२५); देवराजपुत्र अविधेय राजा (४४०-४५५); भविष्य राजा (४५५-४७०) ह्यांचे राज्य होते. भविष्याचा पुत्र अभिमन्यू (४७०-४९०); माधववर्मा (४९०-५३०), देज्ज महाराज ह्यांचे माणदेशावर राज्य होते.

माणदेशात म्हसवडचा अपवाद वगळता एकही शिलालेख आढळत नाही . पण माणदेशाच्या सीमाप्रदेशात मात्र बरेचसे शिलालेख आढळतात. त्यात पंढरपूर, वेळापूर, मंगळवेढा, माडग्याळ, कोळेगिरी इ. आहेत. त्यावरुन माणदेशात कोणकोणत्या राजवटी होत्या, हे स्थूलमनाने सांगता येते.

माणदेशावर बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात चालुक्य राजवट होती. म्हसवडच्या शिलालेखात ह्याचा उल्लेख सापडतो.ह्या शिलालेखाची भाषा कानडी असून तो कल्याण चालुक्य जगदेकमल्ल ह्याच्या काळातील इ. स. ११४६ चा आहे.[६] ह्यात भूमी दान दिल्याचा उल्लेख आहे.

चालुक्य घराणे कमजोर झाल्यानंतर चालुक्यप्रधान बिज्जलदेव कलचुरी ह्याने सत्ता हाती घेतली. इ.स. ११६२ मध्ये मंगळवेढा येथे त्याने स्वतंत्र कलचुरी राज्याची स्थापना केली. त्याचे राज्य माणदेशाच्या पूर्व भागावर असावे. माडग्याळ येथे रायमुरारीच्या काळात (इ.स. ११७२) शेरीफ बिज्जल ह्याने सोमनाथाची दोन मंदिरे बांधली. शिलालेखांमध्ये माणदेशातील काही गावांच्या नावाचा उल्लेख आढळतो. भिल्लणदेव यादवाने इ. स. ११८७ साली कलचुरी राजाचा पराभव करुन हा प्रदेश ताब्यात घेतला.

माणदेश तेराव्या शतकात यादवांच्या अधिपत्याखाली होता. सिंघणराजाने शिंगणापूर हे गांव निर्माण केले. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील इ. स. १२७३ व १२७५ मधील चौऱ्यांशीचा शिलालेख प्रसिद्ध आहे. त्यात माणदेशाचा पहिला स्पष्ट नामोल्लेख आढळतो.[७] रामचंद्र यादवाचा प्रधान हेमाडपंडित ह्याची मोडीलीपी, चुना व खांब न वापरता बांधलेली मंदिरे ही माणदेशात आजही अस्तित्वात आहेत.

देवगिरीच्या यादव साम्राज्याचा अस्त अल्लाउद्दीन खिलजीने इ.स. १२९८ मध्ये केला. तेव्हापासून मोगलांच्या राजवटीला सुरुवात झाली. माणदेश प्रथम बहामनी राज्यात होता. इ.स. १४५६ ते १४६० ह्या काळात माणदेशात प्रचंड दुष्काळ पडला. मंगळवेढ्याच्या दामाजीपंतांनी गरिबांसाठी धान्याचे कोठार वाटले. विठू महाराने त्याचे पैसे बिदरच्या बादशहाकडे जमा केले.[८] ह्यावरून तो भाग बिदरकडे होता व नंतर तो विजापूरच्या अदिलशहाकडे आला, असा तर्क करता येईल.[९] आदिलशहा व निजामशहा एकमेकांच्या प्रदेशावर सतत हल्ले करीत. बुऱ्हाण निमाजशहाने

(१५३४-५४) भीमा नदी ओलांडून दक्षिणेस आदिलशहाच्या प्रदेशावर स्वारी केली. पण त्यात यश आले नाही. उलट आदिलशहाच्या सैन्याने त्याचा पराभव केला.[१०]

इ.स. १६२६ नंतर इमाद निजामशहा व रणदुल्लाखान ह्यांनी माणदेशाच्या प्रदेशावर स्वारी केली. सांगोल्याजवळ कमलापूर येथे छावणी टाकली होती. त्यावेळी सांगोल्याचा किल्लेदार खवासखान होता. खवासखानाचा युद्धात पराभव झाला व सांगोल्याचा परिसर निजामशहाच्या ताब्यात गेला.[११]

सोळाव्या-सतराव्या शतकात माणदेशातील म्हसवडचे माने, जतचे चव्हाण, डफळे, मलवडीचे घाटगे, औंधचे प्रतिनिधी ही घराणी महत्त्वाची आहेत. माणनदीकाठावर म्हसवड हे प्रसिद्ध गाव आहे. माने अगोदर बिदरच्या बादशहाकडे होते. ते शूर होते. त्यांनी स्वतःच्या सामर्थ्यावर माणदेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी रामोशी लोकांचा बंदोबस्त करुन दशहत बसविली. माने कांहीकाळ निजामशहांच्या पदरी होते. काळ फिरल्यावर ते आदिलशहाकडे आले. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळेस रताजी माने ह्यांनी सहकार्य केल्यामुळे आदिलशहाने त्यांना माण परगणा जहागिरी म्हणून दिला.[१२] शिवकाळात माणदेशात अनेक घटना घडल्या आहेत. माणदेशात महिमानगड, भूपाळगड,रामपूरचा किल्ला, सांगोले, मंगळवेढे हे किल्ले होते. आज ते उध्वस्त झाले आहेत. परंतु ते अनेक घटनांचे साक्षीदार आहेत.

भूपालगड हा राजा भूपाल ह्याने बांधला. आदिलशहाशी टक्कर देण्यासाठी शिवाजी महाराजांनी ह्याची डागडुजी करुन घेतली. महाराजांच्या जीवनातील एक अत्यंत दुर्देवी घटना येथे घडली. छत्रपती संभाजीमहाराज मोगलांना मिळाल्यावर ते दिलेरखानासह १७ एप्रिल १६७९ ला ह्या गडावर चालून आले. स्वराज्याचे वारसदार पुढे पाहून किल्लेदाराला किल्ला लढवता येईना. किल्लेदाराने किल्ला सोडून शिवाजीमहाराजांकडे प्रयाण केले. गड दिलेरखानाच्या ताब्यात आला. अनेक लोक कैद झाले. प्रत्येकाचा एक हात तोडला गेला. महाराजांना खूप दुःख झाले. अशा दुर्देवाने पत्कराव्या लागलेल्या पराभवाचे शल्य भूपालगड आजही वागवतो आहे. इ.स. १७३८ ला भूपाळगड पुन्हा नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठ्यांच्याकडे आला.

जतच्या डफळे घराण्याने माणदेशाच्या आग्नेय भागावर तीनशे वर्षे राज्य केले. ह्या घराण्याचा मूळ पुरूष दुदादेव दक्षिणेत आला. त्याच्या दोन मुलांपैकी शार्दुलसिंग हा आदिलशहाच्या फौजेत होता. ह्याचा मुलगा यदलोजी ह्याचे लग्न डफळापूरच्या लखोजी पाटलाच्या मुलीशी झाले. तेव्हा पासून ह्या घराण्यास डफळे घराणे असे नाव पडले. ह्या घराण्यातील सटवाजीराव हे खूप

पराक्रमी, धोरणी व मुत्सद्दी होते. त्यांना आदिलशहाकडून इ. स. १६८१ मध्ये जत, करजगी, बोर्डोल व होनवाडची वतने मिळाली. तसेच वजीराचा हुद्दा व सहा हजार घोडेस्वार व पाच हजार पायदळाची मनसबदारी मिळाली.

छत्रपती संभाजीमहाराजांनी इ.स. १६८७ मध्ये आदिलशहाच्या मदतीने मोगलांच्या प्रदेशावर स्वारी करुन सांगोल्याचा किल्ला ताब्यात घेतला. तेथे माणकोजी हा किल्लेदार नेमला.[१३] परंतु मराठ्यांचे हे राज्य फार काळ टिकले नाही. २९ मे १६८७ रोजी औरंगजेबाने आपल्या सरदारांकरवी सांगोल्याच्या किल्यावर स्वारी करुन किल्ला ताब्यात घेतला.[१४] संभाजीमहाराजांनंतर छत्रपती राजारामांच्या अधिपत्याखाली मराठ्यांनी औरंगजेबाशी झुंज दिली. परंतु त्यात यश आले नाही. राजाराममहाराजांच्या काळात नागोजी माने ह्यांना खूप महत्त्व प्राप्त झाले होते. नागोजीने काळाची पावले ओळखून इ.स. १६८५ मध्ये औरंगजेबाची चाकरी स्वीकारली. बादशहाने त्याला म्हसवडची ठाणेदारी व माण परगण्यातील १३,५०,००० दामाची जहागिरी दिली.[१५]

औरंगजेबाने आदिलशाही व कुतुबशाही बुडविली. छत्रपती संभाजीमहाराजांचा क्रूरपणे वध केला. परंतु मराठेशाही त्याला बुडवता आली नाही. त्यामुळे मोगलांना मिळालेले मराठे सरदार परत मराठेशाहीत आले. त्यात नागोजी मानेही होते. त्यानंतर आपापसातील वैरभावनेतून नागोजीने संताजी घोरपडे ह्या सरदाराचा खून केला.

शाहूमहाराजांच्या अखेरच्या काळात महाराणी ताराबाई ह्यांनी सांगितल्याप्रमाणे राजारामास दत्तक घेण्याचे ठरले होते. नानासाहेबांच्या प्रयत्नाने ते दत्तकविधान ४ जानेवारी १७५० मध्ये झाले. त्यावेळी ताराबाई व नानासाहेब पेशवे ह्यांच्यातील संघर्ष तीव्र झाला. ताराबाईचा आधार कऱ्हाडचे पंतप्रतिनिधी होते. पेशव्यांनी त्यांना निष्प्रभ करण्याच्या उद्देशाने त्यांच्याकडील सांगोले, मंगळवेढे ही ठाणी काढून घेतली. पेशव्यांनी रामराजा व सदाशिवभाऊ ह्यांना प्रचंड फौजेसह सांगोल्याच्या मोहिमेवर पाठविले. १० सप्टेंबर १७५० ला सांगोल्याच्या किल्ल्यावर स्वारी केली व किल्ला जिंकून घेतला. ह्यावेळी सांगोल्यात महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा तह झाला. ह्या तहामुळे मराठ्यांची सत्ता छत्रपतींकडून पेशव्यांकडे गेली. दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशी तह करुन इ.स. १८१८ साली मराठी राज्याचे उदक इंग्रजांच्या हातावर सोडले. पण संपूर्ण माणदेशावर मात्र इंग्रजांचे राज्य आले नाही. कासेगाव, सांगोले, नाझरे, म्हसवड, घेरडी, मलवडी हे भाग इंग्रजांकडे आले. आटपाडी मात्र औंध संस्थानाकडे राहिली. मंगळवेढे सांगलीच्या पटवर्धनाकडे राहिला. जत तालुका व आजच्या मंगळवेढे तालुक्यातील २१ गावे जत संस्थानाची होती. ह्याच सुमारास माणदेशात परिवर्तनाला प्रारंभ झाला.

इ.स. १९२० नंतर माणदेशात राजकीय जागृतीला सुरुवात झाली. टिळकांचे युग संपून गांधीयुगाला प्रारंभ झाला. 'खेड्याकडे चला' अशी हाक देऊन गांधीनी काँग्रेसची चळवळ ग्रामीण भागात पोहोचविली. काळ वेगाने बदलत होता. त्यामुळे माणदेशाच्या राजकीय जागृतीला प्रारंभ झाला. इंग्रजी भागापेक्षा आटपाडी भागातील शेतसारा दुप्पट होता. त्यात माणदेशी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आणि दुष्काळ ह्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसत होता. सारामाफी व इतर काही मागण्यांसाठी औंधवर प्रचंड लाँगमार्च काढण्याचे ठरले. चार हजार शेतकऱ्यांचा मोर्चा चार-पाच दिवस पायी चालत औंधजवळ पोहोचला. अधिकाऱ्यांनी मोर्चा अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु राजे अप्पासाहेब पंत ह्यांनी मोर्चाला सामोरे जाऊन त्यांच्या मागण्या मान्य केल्या व येथून पुढे राजा हा प्रजेचा विश्वस्त म्हणून काम करेल, संस्थानाचा कारभार सर्वस्वी लोकांनी चालवावा, अशी घोषणा केली. औंध संस्थान सर्वांच्या पुढे असावे, खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत. लोकांनी स्वत:चे कल्याण स्वत:च्या जबाबदारीवर केले पाहिजे, अशी राजाची इच्छा होती.[१६] राजर्षी शाहूनंतर ब्राह्मणेत्तर चळवळीचा भर हा सामाजिक कार्यपेक्षा राजकीय सत्ता मिळवून लोकोध्दार करावा, ह्यावर होता. त्यादृष्टीने माणदेशातील नेत्यांनी सत्ता मिळविली. त्यात शामराव लिगाडे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. इ. स. १९२६ सालच्या मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीत ते निवडून आले. येथूनच सांगोले भागात शेतकरी कामगार पक्षाची पार्श्वभूमी तयार झाली.

इ.स. १९२० नंतर कॉंग्रेसची स्वातंत्र्यचळवळ माणदेशात पोहोचली. आमदार पतंगे, भीमराव चव्हाण ह्यांच्या पुढाकाराने इ.स. १९२१ ला माणदेशात कॉंग्रेसची स्थापना झाली. इ.स. १९४२ ची स्वातंत्र्य चळवळ हीच माणदेशात पोहोचलेली खरी स्वातंत्र्य चळवळ होय. नागेश परशुराम चितळे ह्या गांधीवादी कार्यकर्त्याच्या नेतृत्वाखाली सांगोले भागात विविध स्वरूपाचे कार्य झाले. त्यांना अनेकवेळा अटकही झाली. ब्रिटिशांच्यावर त्यांनी दहशत निर्माण केली. ८ नोव्हेंबर १९४२ ला बुद्धिहाळ तलावावरील बंगला जाळला.[१७]

इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. त्यात संस्थाने विलीन झाली. प्रशासनाच्या दृष्टीने नवीन जिल्हे तयार केले गेले. इ.स. १९४९ ला दक्षिण सातारा हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्यात आला. औंधचा आटपाडी भाग खानापूर तालुक्याला जोडण्यात आला. पूर्वीच्या जत संस्थानातील २१ गावे मंगळवेढ्याला जोडण्यात आली.[१८] इ.स. १९५९ ला दक्षिण साताऱ्याचे सांगली असे नामकरण करण्यात आले. इ.स. १९६५ ला खानापूर तालुक्यातून आटपाडी व मिरज तालुक्यातून कवठेमहंकाळ असे स्वतंत्र तालुके निर्माण करण्यात आले. आज माणदेश हा सातारा, सांगली व सोलापूर ह्या तीन जिल्ह्यांमध्ये विभागला गेला आहे. स्वातंत्र्यानंतर देशाने लोकशाही जीवनपद्धती

स्वीकारली. राजकीय जागृती वाढली. सरकारच्या विविध योजनांमुळे विकासकार्याला गती आली. माणदेशात खेडोपाडी प्राथमिक शिक्षणाच्या सोयी निर्माण झाल्या. दळणवळणासाठी कच्चे रस्ते आणि एस. टी. च्या सोयी झाल्या. सोसायट्यांमुळे आर्थिक प्रगतीला मदत होऊ लागली. रोजगार हमी योजनेवर लोकांना काम मिळू लागले. वैद्यकीय सुविधा वाढल्या. अशी जागृत अवस्था स्वातंत्र्यानंतर माणदेशाची झालेली पहावयास मिळते.

## ३.५. माणदेशी समाज आणि संस्कृती :

माणदेशी समाज आणि संस्कृती भारतीय समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. पण सूक्ष्मपणे पाहिल्यास माणदेशी समाजाचा प्रादेशिक वेगळेपणाही आपणाला जाणवतो. हा समाज निसर्गाच्या प्रतिकूलतेमुळे एकजिनसी बनला आहे. आजुबाजूच्या भागापेक्षा माणदेशी लोकांचे वेगळेपण अनेक बाबतीत जाणवते.

माणदेशाची लोकसंख्या ७,६२,६८० इतकी आहे. तेथे बहुसंख्य लोक मराठी भाषिक आहेत. हिंदू व इस्लाम ह्या दोन धर्मांचे लोक येथे आदिलशहाच्या काळापासून एकत्रित राहताना दिसतात. अलीकडे बौद्ध धर्माचे लोक वाढले आहेत. येथील सांस्कृतिक जीवन हे प्रामुख्याने धर्माच्या अनुषंगाने चाललेले दिसते. माणदेशातील मुस्लिम समाजात सुन्नी पंथाचे लोक जास्त आढळतात. थोड्याफार प्रमाणात इतर धर्मीय लोक (ख्रिश्चन, जैन, बागवान, आतार, तांबोळी, कासार इ.) आढळतात. परंतु त्यांची संख्या अतिशय कमी आहे. सर्व समाज लहानसहान व्यवसाय व शेती ह्यावर अवलंबून आहे. माणदेश हा सर्व दृष्टीने मागासलेला भाग आहे.

माणदेशात हिंदू समाज बहुसंख्य असला; तरी तो वर्ण, जाती ह्यामध्ये विभागलेला आहे. वर्णव्यवस्थेने श्रेष्ठ ठरवलेला ब्राह्मणवर्गही येथे आहे. सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत हा वर्ग शहरात स्थायिक झालेला दिसतो. परंतु त्याच्या ठिकाणचा जात्याभिमान, भेदनीती, समाजाच्या अज्ञान-अंधश्रद्धांचा फायदा घेण्याची प्रवृत्ती आजही येथे ह्या समाजात आढळते.

माणदेशात गुजर, मारवाडी, लिंगायत, जैन समाज आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेला जाणवतो, परंतु शेतकरीवर्ग हा सामान्य जीवन जगताना दिसतो. सरळमार्गी, अल्पसंतुष्ट, देवभोळा, अज्ञानी, भाऊबंदकी ह्या दोषांनी मराठा कुणबी समाज पोखरलेला दिसतो. अलीकडे तो शिक्षणाकडे व व्यवसायाकडे वळल्याचे दिसते. विशेषतः माणदेशात धनगर समाज मोठ्या प्रमाणावर आहे. हा समाज शेळ्या-मेंढ्या पाळून त्यावर आपली उपजीविका भागवतो. कोष्टी समाजाचा हातमाग व्यवसायही सध्या बंद पडलेला दिसतो. प्रत्येक गावात बारा-बलुतेदारांची घरे आढळतात.

माणदेशात दलित समाजाची लोकसंख्या लक्षणीय आहे. त्यांच्या गावगाड्याच्या रीतीरिवाजांप्रमाणे त्यांना बलुतेदारीची कामे करावी लागत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीनंतर ह्या समाजात क्रांतीकारक बदल जाणवतो. तसेच पूर्वी गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या अनेक जाती (मांग, रामोशी, फासेपारधी, लमाण, घिसाडी, वैदू इ.) माणदेशात आढळतात. त्यांचे जीवन अतिशय हलाखीचे व दु:ख-दारिद्रयाने गांजलेले आहे. एकंदरीत, माणदेशातील जातिबंधाचे पाश अजूनही कायम असल्याचे जाणवते.

पूर्वी माणदेशी माणूस सदरा, धोतर आणि पटका वापरीत होता. अलीकडे कालानुरूप विजार-शर्ट, पँटशर्ट लोक वापरु लागले आहेत. माणदेशी स्त्री लुगडे-चोळी वापरत होती. अलीकडे स्त्रिया पातळे, ब्लाऊज, परकर वापरु लागल्या आहेत.

माणदेशात घरांच्या बाबतीत वेगवेगळे प्रकार आढळतात. पाऊसमान कमी असल्याने माळवदी घरे आणि तनसाच्या झोपड्या हेच माणदेशात आढळणारे घरांचे खरे प्रकार आहेत. माळवदी घरे उन्हाळ्यात थंड आणि थंडीत ऊबदार राहतात, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ती ७५ ते १०० वर्षे टिकतात. तनसाच्या झोपड्याचे आयुष्य ५ ते ७ वर्षांचे असते. अलीकडे पत्र्याची, कौलाची व सिमेंटची घरे, तसेच बंगले होऊ लागले आहेत. माणदेशी माणूस आसरा म्हणून घराकडे पाहतो.

पूर्वी माणदेशात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. त्यात वडीलधाऱ्या मंडळींना मान असायचा. ह्या पद्धतीत स्त्रियांना खूप कष्ट करावे लागायचे. अलीकडे वाढती लोकसंख्या, विश्वासाचा अभाव, जावाजावांचा संघर्ष, नोकरीतून पैसे मिळविणाऱ्या व्यक्तीबद्दल द्वेष ह्यांमुळे एकत्र कुटुंबाचे विघटन होऊन छोटी-छोटी कुटुंबे तयार होताना दिसत आहेत. माणदेशात खोट्या प्रतिष्ठेपायी लोक कर्ज काढून लग्न आणि सण साजरे करताना दिसतात. हुंड्याच्या पद्धतीने धुमाकूळ घातलेला दिसून येतो. माणदेशातील स्त्रियांची अवस्था खूपच कठीण असलेली जाणवते. शेतकरी, शेतमजूर, दलित स्त्री ह्यांचे जीवन गुलामगिरीचे, कष्टमय व दयनीय असल्याचे जाणवते. स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नव्हते. सासुरवास, पारंपरिक मूल्ये व रूढींचा पगडा ह्यांमुळे स्त्रियांच्या माणूस म्हणून अस्तित्वाची कल्पना नव्हती. ब्राह्मणवर्गातील थोड्या मुली शिक्षण घेत. मात्र अजूनही बहुजन समाजातील पदवीधर मुलींची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहे.

माणदेशात हिंदू लोक परंपरेप्रमाणे सणसमारंभ साजरे करताना दिसतात. त्यात गुढीपाडवा, वटसावित्रीची पूजा, अक्षयतृतीया, पोळा, नागपंचमी, दसरा, दिवाळी, संक्रांत, होळी इ. सण साजरे

करतात. शेतकऱ्यांचा बेंदूर (पोळा) हा सण माणदेशात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करतात. अलीकडे शिवजयंती व गणेशोत्सव हे मोठ्या प्रमाणावर लोक साजरे करताना दिसतात.

माणदेशी माणूस नैसर्गिक परिस्थितीमुळे देवभोळा आहे. माणदेशातील प्रत्येक खेड्यात मारुती, मरिआई, म्हसोबा, खंडोबा ह्यांसारखी ग्रामदैवते आहेत. पंढरपूरच्या विठ्ठलास माणदेशी माणूस सर्वात जास्त मानताना दिसतो. माणदेशातील काही प्रमुख दैवतांचा अधिक विचार पुढीलप्रमाणे करता येईल :

शिंगणापूरचा शंभूमहादेव हे एक प्रमुख दैवत होय. त्याचे मंदिर सह्याद्रीच्या डोंगररांगेत समुद्रसपाटीपासून १२०० फूट उंचीवर आहे. शंभुमहादेवाच्या देवस्थानामुळे येथील डोंगराला 'शंभुमहादेवाचा डोंगर' असे म्हटले जात असावे.

"हा कोथला नामे गिरीवर । माण नदीच्या तीरावर
जेथे शंभुमहादेव शंकर । आनंदेसी राहिला."

असे वर्णन संत दासगणूमहाराजांनी केले आहे.[१९] पूर्वी जंगलाने व्यापलेला हा भाग सध्या रुक्ष आणि ओसाड बनला आहे. मंदिराकडे जाण्यासाठी ४०० पायऱ्या चढून जावे लागते. मंदिर दगडी बांधकामाचे आहे. गाभाऱ्यात शिवपार्वतीची स्वयंभू लिंगे आहेत. चैत्रात येथे मोठी यात्रा भरते. ज्या भक्तांनी नवस केलेला असेल, असे भक्त खालून कावडी आणून देवाला अभिषेक करतात. कावड वाहणारे महादेवभक्त देवाचा धावा करतात. महाराष्ट्रातून अनेक ठिकाणावरुन देवाच्या काठ्या येतात.

ऐतिहासिक माने घराण्यामुळे जसे म्हसवड प्रसिद्ध आहे. तसेच ते सिद्धनाथाच्या प्राचीन देवस्थानामुळेही प्रसिद्ध आहे. मुख्य देवालयात सिद्धनाथ आणि जोगेश्वरी ह्या देवतांच्या दगडी मूर्ती आहेत. देवालयाचा मंडप १२.४० मी. बाय ११.७० मी. आहे. व्हरांड्यात अनेक देव-देवतांच्या मूर्ती आहेत. सिद्धनाथ नवसाला पावतो, अशी समजूत आहे. सिद्धनाथ व जोगेश्वरी ही शंकर पार्वतीची रुपे आहेत.

आटपाडी तालुक्यातील खरसुंडी येथील सिद्धनाथाचे देवस्थान प्रसिद्ध आहे. सिद्धनाथ म्हणजे काळभैरव. त्याचे प्रमुख स्थान सोनारी (ता. परांडा, जि. उस्मानाबाद) येथे आहे. खरसुंडी येथील नायप्पा गवळी ह्या भक्तासाठी सिद्धनाथ तेथे प्रगट झाले, अशी कथा आहे. हे मंदिर विटामातीने बांधलेले आहे. देवासमोर २० ते ३० फूट उंचीच्या ११ दीपमाळा आहेत. पौष महिन्यात

येथे मोठी यात्रा भरते. माणदेशी खिलारी जनावरांची खरेदी-विक्रीही ह्या यात्रेत चालते. सिद्धनाथ हे माणदेशातील प्रसिद्ध देवस्थान आहे.

यलम्मा हे एक ग्रामदैवत आहे. जतला ह्या देवीचे प्रसिद्ध देवस्थान आहे. दरवर्षी माघ वद्य एकादशीला ह्या देवीची मोठी यात्रा भरते. यलम्मा हा रेणुकेचा अवतार आहे. यल्ल अम्मा म्हणजे सर्वांची आई जगदंबा असा अर्थ होतो. यल्लम्मादेवीची मूर्ती उग्र चेहऱ्याची आहे. ती नवसाला पावते, अशी भक्तांची धारणा आहे. देवीच्या उपासकांना जोगती किंवा जोगतिणी म्हणतात.

सांगोले हे माणदेशातील एक महत्त्वाचे शहर आहे. येथील अंबिकादेवीचे मंदिर हे जुने हेमाडपंथी दगडी बांधकामाचे आहे. मंदिरात तीन मूर्ती आहेत. एक तुळजापूरची भवानी, दुसरी औंधची यमाईदेवी आणि तिसरी ग्रामदेवता अंबिकादेवीची. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून येथे नवरात्रोत्सव साजरा केला जातो. हे मंदिर इ. स. १९४८ सालापासून हरिजनांसाठीही खुले आहे.

माणदेशातील कवठेमहंकाळ तालुक्यातील ढालगावजवळ आरेवाडी हे ठिकाण आहे. माणदेशात धनगर समाज जास्त आहे. त्यांचा प्रमुख देव बिरोबा हा असून आरेवाडी येथे खूप मोठी यात्रा भरते. बिरोबाच्या नावाने बकरा सोडला जातो व यात्रेच्यावेळी त्या बकऱ्याचा बळी देतात. इ.स. १९८७ साली ह्या यात्रेत आठ हजार बकरी बळी दिली गेली. ह्यावरुन येथे अंधश्रद्धेचा जबरदस्त पगडा असल्याचे निदर्शनास येते.

वरील सर्व माहितीवरुन काही निष्कर्ष काढता येतात ते असे :

१. माणदेशात शिवरुप, शक्तिरुप, शैव आणि वैष्णव अशी सर्व प्रकारची दैवते आढळतात.
२. दत्ताची अल्प मंदिरे माणदेशात आहेत.
३. बहुजनसमाज सिद्धनाथ, खंडोबा, म्हसोबा, बिरोबा, यल्लम्मा ह्या ग्रामदैवतांना मानणारा आहे.
४. माणदेशात सिद्धनाथाची मंदिरे जास्त आहेत. त्यावरुन तेथे पूर्वी नाथपंथाचा प्रभाव असावा असे वाटते.
५. माणदेशातील लोकांची कुलदैवते माणदेशाबाहेर आहेत.
६. सर्वत्र न आढळणारी वैशिष्ट्यपूर्ण दैवते माणदेशात आहेत. उदा. जवळ्याचे नारायणमंदिर, आटपाडीचे कपिलेश्वर मंदिर.

माणदेशातील यात्रा ह्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या घटना आहेत. यात्रा म्हणजे ग्रामीण जीवनातील माणसाला विरंगुळ्याचा आणि आनंदाचा क्षण असतो. यात्रेत ग्रामीण व शहरी जीवनाचा एक संमिश्र आविष्कार दिसतो. दोन्ही जीवनामध्यें, संस्कृतीमध्ये

यात्रेच्या निमित्ताने आदानप्रदान होते. माणदेशातील यात्रेला वेगवेगळ्या कारणांनी महत्त्व प्राप्त झालेले दिसते. ज्या दैवताची यात्रा आहे, त्याचे महात्म्य, लोकांची त्यावरील श्रद्धा आणि दुसरे म्हणजे व्यापारी आर्थिक उलाढाल हे होय. यात्रेतील जनावरांचे बाजार शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. माणदेशातील व्यापार वर्षभर चालत नाहीत. त्यांमुळे यात्रेच्यावेळेसच मोठमोठी दुकाने दिसतात. त्यातून लोक वर्षभरासाठीची खरेदी करतात, तर आठवड्याच्या बाजारातून लोक आठवड्यासाठीची खरेदी करताना दिसतात. यात्रेत शेतीची प्रदर्शने भरविली जातात. तसेच भटक्या विमुक्त जमाती अशा यात्रेच्या रुपाने एकत्र येतात. त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना (देण्याघेण्याचे व्यवहार, न्यायदान, लग्न ठरविणे, जातपंचायत) ह्या यात्रेतून घडतात.

माणदेशाच्या जडणघडणीत साधुसंतांचा वाटा महत्त्वाचा आहे. रंगनाथस्वामी निगडीकरांचा जन्म इ.स. १६१२ साली नाझरे येथे झाला. त्यांचे मूळ घराणे चवसाळे महालातील खडकी गावाचे वतनदार देशमुखांचे होते. त्यांना नाझऱ्याचे वतन मिळाले. रामदासस्वामींशी त्यांचा जवळचा संबंध होता. त्यांच्या घराण्यात सतत दोनशे वर्षे साधुत्वाची व ग्रंथनिर्मितीची परंपरा चालू होती. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्यांच्या घरात लग्नाचा विचार सुरु झाल्यानंतर कोणालाही न सांगता घरातून ते पळून गेले. त्यांनी हिमालयात बारा वर्षे तपश्चर्या केली. तेथे त्यांना साक्षात्कार झाला. नंतर त्यांनी 'योगवसिष्ठसारटीका' नावाचा ग्रंथ लिहिला. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी मार्गशीर्ष वद्य दशमी, रविवार, शके १६०६ (इ.स. १६८४) रोजी निर्गुणपुरी येथे समाधी घेतली.[२०]

रंगनाथस्वामींचे चुलतभाऊ, ब्रह्माजीपंत नाझरेकर हे होत. त्यांचे सर्व जीवन नाझरे येथे गेले. नाझरे येथे माणनदीच्या काठी त्यांची समाधी आहे. वयाच्या उत्तरार्धात ते पंढरपूरला वास्तव्यास गेले. तेथेच त्यांनी संन्यास घेतला. मातृभूमीविषयी त्यांना फार अभिमान होता. त्यांनी 'आत्मप्रकाश' नावाचा ग्रंथ इ.स. १६८२ ला लिहिला.[२१] त्यांनी संपूर्ण आयुष्य धर्माचरणात व लोकोपदेशात घालविले. पंढरपुरी भीमेच्या वाळवंटात त्यांनी इ.स. १६९३ साली समाधी घेतली.

श्रीधरस्वामी नाझरेकर ह्यांचा जन्म नाझरे ह्या गावी देशपांडे घराण्यात इ.स. १६५८ साली झाला. दत्त संप्रदायातील हे संत होते. लहानपणीच त्यांचे लग्न झाले. 'महाभारत', 'भागवत', 'रामायण', 'स्कंदपुराण' इ. संस्कृत ग्रंथांचे त्यांनी अध्ययन केले. ते बहुश्रुत व विद्वान होते. वरील ग्रंथांच्या व्यासंगाचा त्यांनी आपल्या ग्रंथांमध्ये वापर केला. अलौकिक कीर्तनकार म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई होते. त्यांना तीन मुले झाली. दत्तात्रय, मनोहर व रंगनाथ. श्रीधरांचा गृहस्थाश्रम सुखासमाधानाचा झाला. त्यांनी इ.स. १६९३ ते ९८ ह्या काळात भारतभर तीर्थयात्रा केली. ते पंडितीवळणाचे कवी होते. परंतु त्यांच्या लेखनात माणदेशी

समाजजीवनाचे प्रतिबिंब फारसे दिसत नाही. सर्वसामान्य लोकांना कथेच्या माध्यमातून परमार्थाचे ज्ञान करुन देण्याचा त्यांचा हेतू मात्र सफल झाला. त्यांनी 'हरिविजय','रामविजय','वेदान्तसूर्य', 'पांडवप्रताप', 'शिवलीलामृत' हे ग्रंथ लिहिले.

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज हे नाममाहात्म्यातून परमेश्वरप्राप्तीचा मार्ग माणदेशी माणसांना दाखविणारे अलीकडील काळातील महत्त्वाचे संत होत. इ.स. १८४५ मध्ये वावरहिरे ह्या गावी त्यांचा जन्म झाला.[२२] खडतर तपश्चर्येनंतर त्यांना गुरुंचा आशिर्वाद मिळाला. मराठवाड्यातील ऐहळे गावी तुकाराम चैतन्य ह्यांनी हा आशिर्वाद दिला. त्यानंतर त्यांना आनंदावस्था निर्माण झाली. म्हणूनच त्यांना 'ब्रह्मचैतन्य' असे म्हटले जाते.[२३] त्यांनी उत्तरेत आठ वर्षे तीर्थयात्रा केली. त्यानंतर ते परत गावी आले. घरी न जाता मारुतीच्या मंदिरात थांबले. कोणी महात्मा आला म्हणून गावकऱ्यांबरोबर त्यांच्या माता-पित्यानेही त्यांचे दर्शन घेतले. परंतु गावातील लोकांना त्यांचा संशय आल्यावर ते निघून गेले. नंतर एक वर्षाने ते परत आले. आईची इच्छा म्हणून त्यांनी लग्न केले. एक मुलगाही झाला. परंतु पत्नी व मुलगा लवकरच कालवश झाल्यामुळे त्यांना संसारसुख लाभले नाही. पुढे इ.स.१८९० मध्ये गोंदवल्यास रामकृपेने मोठे राममंदिर बांधले. "संसार करुन परमार्थ करावा, जेथे भगवंताचे स्मरण तेथे माझे वसतिस्थान" असे सांगून २२ डिसेंबर १९१३ ला पहाटे ते अनंतात विलीन झाले.

मंगळवेढे हे माणदेशाच्या सीमारेषेवर असणारे शहर संतांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. महार जातीत जन्मलेल्या, पण भक्तीच्या बळावर उद्धारला गेलेला संत चोखामेळा, पत्नी सोयराबाई, मेहुणा बंका, मुलगा कर्ममेळा हे सर्व भगवद्भक्त मंगळवेढ्याचेच होते. तसेच संतकवयित्री कान्होपात्रा हीसुद्धा मंगळवेढ्याचीच होती. विशेषतः दामाजीपंतांच्या नावाने मंगळवेढे ओळखले जाते. इ.स. १४५८ ते ६० च्या दरम्यान येथे दुष्काळ पडला होता. त्यावेळी दामाजीपंत हे बिदरच्या बादशहाचे मंगळवेढ्यातील अंमलदार होते. मंगळवेढे ज्वारीचे कोठार म्हणून तेव्हापासून प्रसिद्ध आहे. दुष्काळात उपाशी मरणाऱ्या लोकांचे हाल दामाजीपंतांना बघवले नाहीत. त्यांनी बादशहाच्या अवकृपेची पर्वा न करता धान्याची कोठारे लोकांना वाटून टाकली व नंतर विठू नावाच्या महाराने पैसे भरले. अशा दामाजीपंतांचे मंगळवेढ्यात मोठे मंदिर आहे. त्यांची रचना मात्र उपलब्ध नाही.

संजीवास्वामीमहाराज मूळचे कर्नाटकातील होते. मूळ नाव पद्नाभ शेट्टी होते. शिक्षण एम.ए. (इंग्रजी) पर्यंत झाले होते.[२४] मुंबईला ते चांगल्या नोकरीवर होते. परंतु लहानपणापासूनच त्यांचा अध्यात्माकडे ओढा असल्यामुळे ते नित्यानंदस्वामींचे शिष्य बनले. पुढे मुंबईहून रेल्वेने पंढरपूरला आले. पंढरपूरहून चालत नाझऱ्याला आले व दत्तानंदाच्या समाधीजवळ राहू लागले.

संजीवास्वामींनी नाझरे येथे अनेक धार्मिक उत्सव सुरु केले. त्यांनी जातिभेद कधीही मानला नाही. गरीब-श्रीमंत असा भेदभाव मानला नाही. अनेकांना सन्मार्गाला लावले. त्यांनी अभंग व पदे लिहिली आहेत. अशा ह्या थोर संताने इ.स. १९८२ ला आपला देह ठेवला.

खर्डीच्या सीताराममहाराजांचा जन्म इ.स. १८५४ साली झाला. सावत्र आईच्या जाचामुळे त्यांनी घरदार सोडले व ते अक्कलकोटला राहिले. तेथून मंगळवेढ्यास आले. तेथून खर्डीस प्रयाण केले आणि लोकांना मदत करु लागले. परमार्थ सांगताना प्रपंच करावा, हेही सांगू लागले.

इतरही अनेक संत माणदेशात होऊन गेले. त्यात इंचगिरी संप्रदायातील जतच्या शिवलिंगव्वाअक्का, सांगोल्याचे राणोजीबुवा, बिसूरचे विष्णुमहाराज ह्यांचा समावेश होतो.

## ३.६. माणदेशातील साहित्यिक आणि साहित्य :

कोणताही साहित्यिक हा त्याच्या स्वतःच्या प्रदेशातील संस्कारानेच घडत असतो. आधुनिक काळात माणदेश सर्वांना माहित झाला तो माडगूळकर बंधू ह्यांच्यामुळे. त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा सभोवतालच्या जीवनात शोधता येतात. त्यात प्रादेशिक जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

माणदेशाच्या दुष्काळी भागाला पडलेले काव्यस्वप्न म्हणजे गजानन दिगंबर माडगूळकर हे होय. माडगुळे (ता. आटपाडी, जि. सांगली) येथे त्यांचा जन्म झाला. तेथेच ते लहानाचे मोठे झाले. तेथील सर्व वातावरणाचा परिणाम त्यांच्या संस्कारक्षम मनावर झाला. प्रदेश हा माणसाच्या शरिराबरोबर मनाचेही पोषण करतो. त्यामुळे त्यांच्या ग्रामीण साहित्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी एकजीव झालेला माणदेश आढळतो. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, आत्मवृत्तपर लेखन, ललित लेख, निबंध, शिशुगीत, लावणी, अभंग, चित्रपटगीत आणि व्यक्तिचित्र असे विविध वाङ्मयप्रकार हाताळले. 'आकाशाची फळे' ही कादंबरी त्यांनी देवा कुंभाराच्या जीवनावर लिहिली आहे. त्यातील त्याचे दारिद्र्याने गांजलेले जीवन पाहिले, तरी ही कादंबरी माणदेशी असल्याचे लक्षात येते. 'उभे धागे, आडवे धागे' ह्या त्यांच्या कादंबरीतून तर सारा माणदेश साकार होतो. कादंबरीत जगू पावसाविषयी म्हणतो, "आमच्या मुलखात पावसाची वडच, मृग नक्षत्राचे चार थेंब पडले, दगड भिजव्या पाऊस." माणदेशातील पावसाचे हे वर्णन आहे. माणदेशी जीवनातील सादपडसाद त्यांच्या साहित्यात स्पष्टपणे उमटलेले दिसतात. त्यांच्या ग्रामीण कथेतूनही माणदेशाचे स्पष्ट चित्रण आढळते. 'लपलेला ओघ' (१९६१) ह्या कथासंग्रहातील 'मुके प्रेम' ह्या कथेतील नदी, माळरान आणि ऊन्हाची वर्णनें माणदेशी वाटतात. "माथ्यावर आभाळ जळत होते. वैशाखी दुपार

जणू साऱ्या जगावर आग ओकत होती" (वीज), हे दुपारचे वर्णन माणदेशातीलच आहे. माडगुळे, माणनदी, आसपासचा परिसर म्हणजेच माणदेश. तेथील लोकांचे कष्टमय जीवन, त्यांचा भोळाभाव, माणुसकी, धार्मिक सहिष्णुता ह्या सर्वांना गदिमांनी आपल्या साहित्यातून अमर केले आहे. माणदेशी माणूस निसर्गाशी आणि परिस्थितीशी झगडत मोठा होतो. गदिमांचे जीवन त्याला अपवाद नाही. त्यांनी माणदेशाचे केलेले वर्णन हे कलात्मक पातळी गाठणारे आहे.

गदिमांपेक्षा त्यांचे धाकटे बंधू व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कथात्मक साहित्यातून माणदेश अधिक वास्तव पद्धतीने साकार झालेला दिसतो. खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला माणदेशाची ओळख त्यांनीच करुन दिली. अभिजात प्रतिभेचे देणे लाभलेला कलावंत म्हणून व्यकंटेश माडगूळकरांकडे पहावे लागते. माणदेश हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनला होता. माणदेशी निसर्ग, प्राणिसृष्टी, पशुपक्षी, मानवी जीवन, संस्कृती ह्यांनी माडगूळकरांचे व्यक्तिमत्त्व घडवले आहे. माणदेश हीच त्यांची साहित्यपंढरी आहे. 'माणदेशी माणसे' (१९४९) च्या निर्मितीप्रेरणेविषयी त्यांनी म्हटले आहे. "आठवून आठवून ही माणसे लिहिली. त्यातले सगळे मुखवटे खरे आहेत. माणदेशात वणवण हिंडून एकेकाला मला बोलवावे लागले आहे. हातापाया पडून बळेबळे मला ओढून आणावे लागले आहे."[२५] 'बनगरवाडी' (१९५५) ही साहित्यकृती त्यांच्या मास्तर असलेल्या भावाने कथन केलेल्या काही घटनांमधून निर्माण झाल्याची दिसते. तेथील धनगरांचे जीवन दुष्काळामुळे उध्वस्त होते. हे 'बनगरवाडीत' दिसते. सर्व ऋतूतील बदलत्या निसर्गाचे चित्रण 'बनगरवाडीत' आहे एका संपूर्ण गावाचे ते चित्रण आहे. ह्याविषयी गंगाधर गाडगीळ म्हणतात. "माणदेशाच्या आणि त्यांच्या (साहित्यिक) नंदनवनाच्या सीमारेषा एकच आहेत."[२६] व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यात माणदेशाचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते. तेथील निसर्ग हा त्यांच्या कथांचा एक अविभाज्य भाग म्हणून अवतरतो. निसर्ग आणि माणूस ह्यांची फारकत करता येत नाही. कथेतील प्रतिमाही माणदेशीच येतात. उदा. 'झेल्या बिथरलेल्या खोंडासारखा उभा होता.' किंवा 'झुडपावरुन भोरड्याचा कळप उडावा, तशी पोरे पाट्यादफ्तर घेऊन बाहेर पडली.' थोडक्यात, माणदेशाच्या भूप्रदेशाची अनेक वैशिष्ट्ये व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधून चित्रित झालेली आहेत. प्रादेशिकतेचा पहिला खरा स्पर्श ह्यांनीच मराठी साहित्याला करुन दिला, असे म्हणावे लागते. त्यांच्या कथांचे स्वरुप बऱ्याचदा व्यक्तिचित्रणात्मक झालेले दिसते. 'गावाकडच्या गोष्टी' (१९५९) 'काळी आई' (१९६२) ह्या कथासंग्रहांमधूनसुद्धा जिवंत माणदेश समोर साकार होताना दिसतो.

शंकरराव खरात मूळचे सांगली जिल्ह्यातील आटपाडीचे. त्यांच्या जीवनात दु:ख, दैन्य आले. दलित लेखक म्हणून ते ओळखले जातात. गावगाड्याच्या बारा बलुतेदारीपासून त्यांचे जीवन सुरु होत असल्याने त्यांनी त्यावर लेखन केले. 'बारा बलुतेदार' (१९५९) हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. माणदेशातील बलुतेदारी पद्धत कशी जीवघेणी आहे, ह्याचे वर्णन त्यामधून येते. बलुत्याचे काम करुनही बलुतं मिळत नाही, ह्या चित्रणाबरोबरच अशा दारिद्रयामुळे त्यांच्या हातून घडणारे गुन्हे, त्यांचा मस्तवालपणा ह्याचेही चित्रण दिसून येते. 'सांगावा' (१९६२), 'दौंडी' (१९६५) हे त्यांचे कथासंग्रह दलितांच्या दु:खाला वाचा फोडणारे आहेत. 'तडीपार' (१९६१) ह्या त्यांच्या कथासंग्रहात गावाच्या व्यवस्थेत कोणतेही स्थान नसलेला आणि जगण्यासाठी गावोगावी भटकत असलेल्या भटक्या विमुक्त जमातीचे चित्रण आलेले आहे. शंकरराव खरात त्यांनी ग्रामीण भागातील माणूस जगण्यासाठी पुण्या-मुंबईला जातो, तो झोपडपट्टीत राहतो, ह्यावर 'झोपडपट्टी' (१९९३), 'हातभट्टी' (१९७०), 'फूटपाथ नं. १' (१९८०) ह्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'गावचा टिनोपाल गुरुजी' (१९७१) ह्या कादंबरीत त्यांनी स्वातंत्र्यानंतरच्या अपप्रवृत्तीवर प्रकाश टाकलेला दिसतो. विशेषत: अस्पृश्यांच्या यातनांचे व हालअपेष्टांचे मनाला पीळ पाडणारे चित्रण त्यांनी केले आहे. पददलितांच्या जीवनाकडे ते मानवतावादी दृष्टिकोनातून पाहतात. माणदेशी जीवनाचे संदर्भ त्यांच्या साहित्यात सापडतात. परंतु ते अस्सल माणदेशी वाटत नाहीत.

माणदेशातील आजच्या ग्रामीण साहित्यात लेखन करणारे डॉ. द. ता. भोसले हे आघाडीचे लेखक आहेत. त्यांनी 'मी आणि माझा बाप' (१९६९), 'इथे फुलांना मरण जन्मता' (१९७४) ह्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ह्या दोन्हीही कादंबऱ्यांमधून माणदेशातील आजचे ज्वलंत दारिद्रय प्रत्ययास येते. 'अन्न' (१९७१), 'पाळत' (१९७७), 'पाऊस' (१९८५), 'अगं अगं म्हशी' (१९८२), 'पार आणि शिवार' (१९८५) हे त्यांचे कथासंग्रह कमालीचे कलात्मक आहेत. त्यामधून माणदेशी संस्कार व चित्रण दिसून येते.

ह्याशिवाय अनेक साहित्यिक आज माणदेशात आहेत. म. गो. पाठक, डॉ. भीमराव कुलकर्णी, उत्तम बंडू तुपे, प्रा. अरुण कांबळे, शांताबाई कांबळे, डॉ. अविनाश सांगोलेकर, शहाजी चंदनशिवे, डॉ. कृष्णा इंगोले, वामन जाधव ही त्यातील काही महत्त्वाची नावे होत.

माणदेशात मौखिक परंपरेने चालत आलेले साहित्य ही मोठ्या प्रमाणावर आढळते. त्यात धनगरी ओव्या, स्त्रियांची गाणी, गोंधळगीते, शाहिरी, पोतराजांची गाणी, लोककथा इ. प्रकारचे साहित्य आहे. माणदेशात पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे लोक आभाळाकडे डोळे लावून बसतात. ह्यावरून

"पडपड पावसा, मिरगा आधी रोहिणीचा
धरणीमाता बोल, कवा येचिल माझ्या गावा,"

अशी लोकगीते सापडतात. खिलारी जनावरे हे माणदेशाचे वैभव आहे. ह्यासंबंधीची गाणीं सापडतात उदा.

"बैलामधी बैल, बैल हौस्या किती उंच
छड्या घालून गाडी रच ।
गाडीची बैलं कुण्या हायती शेन्याची
अशी दृष्ट काढीते बैलासंग धन्याची ।"

## ३.७. माणदेशाची इतर अंगे :

शिक्षणाने सर्वांचा विकास होऊ शकतो. स्वांतत्र्यपूर्व काळांत माणदेशात काही ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सोय झाली होती. त्या फक्त उच्च जातीतील मुलेच शिक्षण घेत होती. माणदेशात अजूनही शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी खूप वाव असलेला दिसतो.

माणदेशात आज अनेक माध्यमिक शाळा झाल्या आहेत. सांगोल्यात १९५२ साली पहिले हायस्कूल निघाले. आज माणदेशात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये निघाली आहेत. जतला 'राजे रामराव महाविद्यालय' (१९६९) आहे, तर दहिवडीला 'आर्टस्,कॉमर्स कॉलेज 'आहे. तसेच मंगळवेढे, सांगोले, आटपाडी येथेही महाविद्यालये आहेत. शिक्षणामुळे माणदेशाने महाराष्ट्राला चांगले लोक पुरविले आहेत. सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे माणदेशातील मुले जिद्दीने शिक्षण घेऊन प्राध्यापक, डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ होऊ लागलेली दिसतात. ह्या दुष्काळी भागात सुपीक डोक्याचे लोक निर्माण झालेले दिसतात. परंतु माणदेशाला त्यांचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. ह्याला अपवाद फक्त साहित्यिकांचाच असलेला दिसतो. माणदेशाबद्दल येथून बाहेर गेलेल्या लोकांना प्रेम असल्याचे जाणवते. माणदेशाचा शैक्षणिक विकास होत असला; तरी आजही माणदेशात कृषी महाविद्यालय, मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज किंवा व्यवसाय अभ्यासक्रम ह्यासारख्या सोयी नाहीत.

माणदेशात प्राचीन काळापासून समृद्धीचे दिवस कधीच आलेले नाहीत. राजकीयदृष्ट्याही माणदेश संघर्षाचा प्रदेश बनलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातही माणदेश तीन जिल्ह्यांमध्ये विभागला असल्याने आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या माणदेशाची उपेक्षाच झालेली दिसते.

महाराष्ट्र हे भारतातील सरासरीने प्रगत राज्य आहे. परंतु देशातील कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र विकासाचा प्रादेशिक असमतोल जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्र हा प्रगत भाग समजला जातो. पण पश्चिम महाराष्ट्रात असा काही भाग आहे की, जो आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अवर्षणप्रवण क्षेत्रात माणदेशातील सहाही तालुक्यांचा समावेश होतो. अवर्षणप्रवणता म्हणजे कायम दुष्काळ व दारिद्रय. सारांश, माणदेश हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला भाग आहे.

विशिष्ट भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती हेच माणदेशाच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण आहे. शेती हा त्यावर आधारित पूरक व्यवसाय आहे. पाऊस नसल्यामुळे शेतीची स्थिती अत्यंत बिकट आहे. माणनदीकाठची जमीन सोडली, तर सगळीकडे डोंगराळ जमीन आहे. तिची जलधारणक्षमता अत्यंत कमी आहे. सतत होणारी जमिनीची धूप, कमी कसदारपणा ह्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.

माणदेशाचे हवामान उष्ण व कोरडे आहे.अतिउष्ण उन्हाळा, जास्त थंडी नसलेला हिवाळा, अनिश्चित पावसाळा असे ऋतुमान येथे आहे. साहजिकच पर्यावरणाचा समतोल ढासळलेला दिसतो. हा पर्जन्यछायेचा प्रदेश आहे. ५०० ते ५५० मी.मी. इतका कमी पाऊस येथे पडतो. रोहिणी-मृग नक्षत्राच्या थोड्याफार पावसावर शेतकरी खरिपाची पेरणी करतात. परंतु त्यात सातत्य न राहिल्यामुळे ती पिके नष्ट होतात. पुढे सप्टेंबरच्या पावसावर रब्बीची पेरणी होते. पण नंतर पावसाचे सातत्य रहात नसल्यामुळे रब्बीची पिकेही नष्ट होतात. त्यामुळे माणदेशात दुष्काळ नेहमीच असतो. अशी शेतीची दयनीय परिस्थिती आणि त्यात वाढती लोकसंख्या ह्यामुळे लोकांचे दारिद्रय दिवसेंदिवस वाढत आहे.

माणदेशी माणूस अनेक पूरक व्यवसाय करून आपला चरितार्थ चालवतो, त्यात खिलारी जनावरांची पैदास, कोंबडीपालन, शेळी-मेंढीपालन इ. व्यवसाय केले जातात. हे सर्व व्यवसाय शेतीवर अवलंबून असलेले दुय्यम व्यवसाय आहेत. त्यामुळे शेतीची दुरावस्था व्यवसायावर परिणाम करते.

माणदेशात कारखाने फारसे नाहीत. उल्लेखनीय असे दोनच मोठे कारखाने आहेत. तेही सहकारी तत्त्वावर चालवले जाणारे असे आहेत. सांगोल्याची 'शेतकरी सहकारी सूतगिरणी' व आटपाडीचा 'माणगंगा सहकारी साखर कारखाना' हे ते कारखाने होत. माणदेशाच्या विकासात ह्यांचा सर्वात मोठा वाटा आहे.

हजारो लोक काम करीत आहेत. सोने, चांदी व्यवसायात आटपाडी भागातील अनेक लोक भारतभर पसरलेले आहेत. सांगली-कोल्हापूर येथे ऊसतोडणीसाठी अनेक लोक जात आहेत. अलीकडे गोव्याच्या खाणीत दगड काढण्यासाठी बरेच लोक जातात. शिकलेले लोक नोकरीसाठी महाराष्ट्रभर आहेत. त्यामुळे येथील अर्थव्यवस्थेला हातभार लागतो. परंतु ह्याचा जाणवणारा परिणाम दिसत नाही.

## ३.८. माणदेशाचे प्रश्न आणि विकासाची दिशा :

माणदेशावर सुरूवातीपासूनच अन्याय झालेला दिसून येतो. राजकीय आणि नैसर्गिकदृष्ट्या माणदेश विकासापासून वंचित राहिला आहे. त्यामुळे येथील गोर-गरीब, पददलित, शेतकरी ह्या वर्गाची प्रगती करणे, ही माणदेशाच्या विकासाची दिशा असली पाहिजे.

आज माणदेशी माणसाला माणदेशाबद्दल प्रेम, आस्था फारशी वाटत नाही. मातृभूमीविषयी त्याला काहीशी तुच्छता वाटते. माणदेश मागासलेला आहे. निसर्गसृष्टी नाही, हे खरे असले; तरी त्याविषयी प्रेम वाटू नये, हे योग्य नाही. माणदेशातील समाजसुधारकांना ही अस्मिता जागृत करण्याचा फारसा प्रयत्न केलेला दिसत नाही.

माणदेशात मानाङ्क, रामराव डफळे, भवानराव पंतप्रतिनिधी ह्यांच्यासारखे पराक्रमी राजे; श्यामराव लिगाडे, अप्पासाहेब पंत, गणपतराव देशमुख, कै. चं.वि. झपके ह्यांच्यासारखी कर्तबगार माणसे; साहित्याच्या क्षेत्रात 'महाराष्ट्रवाल्मिकी' ग. दि. माडगूळकर, कथाकार व्यंकटेश माडगूळकर, दलित साहित्यिक शंकरराव खरात निर्माण झाले. तसेच रंगनाथस्वामी निगडीकर, श्रीधरस्वामी नाझरेकर, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज असे थोर संत निर्माण झाले. अशा मातीविषयी अभिमान वाटला पाहिजे. ज्या भूमीत सोन्यासारखी डाळिंबे-बोरे निर्माण होतात, त्या भूमीचा अभिमान बाळगायला काहीच हरकत नाही. अशा अस्मितेच्या गोष्टी जनमानसात रूजविल्या पाहिजेत.

माणदेशातील माणसांच्या मनाचा बारकाईने विचार केल्यास एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते, ती म्हणजे सततच्या दुष्काळामुळे, अन्यायामुळे, दैन्यामुळे येथील माणूस सहनशील बनला आहे. त्यामुळे त्याचा स्वत:च्या कर्तृत्वावरील विश्वासच उडालेला आहे. दुसऱ्याच्या तोंडाकडे लाचारीने पहात राहिल्यास काहीच होणार नाही. आज विज्ञानामुळे प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते. इस्त्राईलसारख्या देशात वाळवंटात शेती केली जाते. आपल्याकडे तर जमीन आहे. ह्यामुळे दुष्काळी परिस्थितीवर मात करता येईल. त्यासाठी फक्त विकासाची जिद्द असली पाहिजे.

माणदेशाच्या दु:खाचे खरे मूळ पाण्यात सापडते. माणदेशात सतत दुष्काळ पडतो. दुष्काळ म्हणजे सरासरी पावसाच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडणे. पाऊस नसल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खाली जाते. पाण्याच्या टंचाईमुळे उत्पादन घटते. त्याची झळ शेतकरी, शेतमजुर ह्यांना बसते. दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती आहे. ती वारंवार निर्माण होत असेल, तर त्यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे. ह्यावर उपाय म्हणजे प्राप्त पाणी काटकसरीने वापरणे किंवा बाहेरुन पाण्याची सोय करणे.

माणदेशात पाऊस कमी पडत असल्यामुळे तेथे भूपृष्ठावर जास्त पाणी नसते. नद्या सतत कोरड्या असतात. त्यामुळे शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नाही. पावसाच्या रुपाने पडणारे पाणी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ह्या तत्त्वाने भूमीत जिरविले पाहिजे. तसेच माणदेशातील उपनद्यांवर कोल्हापूरपद्धतीचे बंधारे बांधले पाहिजेत असे केल्यास पाण्याचा प्रश्न सुसह्य होईल.

माणदेशातील भूगर्भातील पाण्याचा विचार करताना अनेक बाबी लक्षात येतात. येथील जमिनींची खोली कमी असल्याकारणाने ती जास्त प्रमाणात पाणी धारण करु शकत नाही. तसेच येथे आग्निजन्य खडक असल्यामुळे त्यात खोलवर पाणी झिरपत नाही. आज जमिनीत कितीही खोलवर खोदले, तरी पाणी उपलब्ध होत नाही. ह्यासाठी विहिरी खोदल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना बँकांनी कमी व्याजाने कर्ज दिले पाहिजे.

पाण्याच्या वापरासंबंधी विचार केला पाहिजे. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. तिचा काटकसरीने वापर केला पाहिजे. पाण्याचा अपव्यय म्हणजे राष्ट्रीय संपत्तीची हानी होय. आज आपण पिकांना पाणी देण्याऐवजी जमिनीला पाणी देतो. म्हणून ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केला पाहिजे.

माणदेशाच्या विकासासाठी बाहेरुन पाणी आणणे, हा दुसरा भाग आहे. येथे पाणी आणावयाचे असल्यास भीमा, नीरा किंवा कृष्णा खोऱ्यातून आणावे लागेल.परंतु समुद्रसपाटीपेक्षा माणदेशाची उंची जास्त आहे. त्यामुळे पाणी बाहेरुन आणण्यात असंख्य अडचणी आहेत. तरीही काही योजना सुचविता येतात. त्या अशा :

१. उजनी धरणातील उजव्या कालव्याचे पाणी उचलून शिंगणापूरच्या डोंगरावर आणल्यास निम्मा माणदेश पाण्याखाली येऊ शकतो.
२. कृष्णेचे पाणी भिवघाटाच्या डोंगरात आणल्यास ते माणखोऱ्यात येते.

माणदेशातील जमिनीची धूप थांबविण्यासाठी संपूर्ण माळरानावर वृक्षलागवड झाली पाहिजे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे अलीकडे कोरडवाहू शेतीतून उत्पादन कमी निघते. त्यापेक्षा वृक्षलागवड

आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरु शकते. फळबागांची लागवड ही त्या दिशेने होणाऱ्या प्रयत्नाचा एक भाग आहे. वृक्षतोड थांबविण्यासाठी बिगर पारंपरिक उर्जासाधनांचा विस्तार केला पाहिजे. (उदा. गोबर गॅस, सौरउर्जा, पवनचक्की इ.) वृक्षलागवडीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले पाहिजे. माणदेशातील पशुखाद्यासाठी कुरणविकास मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे.

अलीकडे माणदेशात फळबागांचा विकास मोठ्या प्रमाणावर होत आहे. माणदेशात आज २५०० एकर डाळिंब व २००० एकर बोरीच्या बागा आहेत. येथील हवामान फळबागांसाठी पोषक आहे. फळबागलागवड मोठ्या शेतकऱ्यापर्यंतच मर्यादित आहे. ह्याचे कारण सामान्य शेतकऱ्याला लागवडीचा खर्च परवडत नाही. एक एकर डाळिंबासाठी एकरी १५००० रु. खर्च येतो. दुसरे असे की, सामान्य शेतकऱ्याला फळबागेची माहिती व ज्ञान सहज मिळत नाही. ह्यासाठी सांगोले तालुक्यात फळबाग विकास केंद्र होण्याची नितांत आवश्यकता आहे. फळाची बाजारपेठही माणदेशापासून दूर आहे. त्यामुळे माणदेशातच वेगवेगळे ज्युस, मद्य, मध तयार करण्याचे कारखाने विकसित करता येतील.

माणदेशातील खिलारी जनावरे हे माणदेशाचे वैभव आहे. ह्याची देशभरात जाहिरात केली,तर मागणीमध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांना चांगला पैसा मिळू शकेल. खिलाऱ्या गाईचा भाकडकाळ जास्त असतो. तो कमी करुन दूध वाढविण्याच्या दृष्टीने संशोधन होणे गरजेचे आहे. माणदेशातील जनावरांचे बाजार व यात्रा येथील सोयी वाढविल्या पाहिजेत.

माणदेशातील मेंढपाळांच्या प्रश्नाकडे तर कोणाचेच लक्ष दिसत नाही. शासनाच्या मेंढीविकास योजनेचा प्रभाव माणदेशात जाणवत नाही. स्थलांतरांचा प्रश्न मेंढपाळांना सतत भेडसावतो. उन्हाळ्यात येथील मेंढपाळ चारा-पाण्यासाठी बाहेर जातात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी फिरत्या शाळा सुरु करता येतील. दुष्काळात चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनतो.

जनावरांच्या रोगराईसंबंधी माणदेशात जास्त जागृती दिसत नाही. त्यात शासकीय सुविधांचा अभाव जाणवतो.त्यामुळे देवीसारख्या रोगाने मेंढपाळांचे जास्त नुकसान होते. लोकरीला योग्य भाव मिळत नाही. व्यापारी मेंढपाळांची अक्षरक्ष: लुबाडणूक करतात. कापसाप्रमाणे सरकारने लोकर एकाधिकार हमी किमंतीला खरेदी केली पाहिजे. लोकरप्रक्रिया कारखाने सांगोल्यात काढावेत. खिलारी जनावरे व शेळी - मेंढी पालनामुळे माणदेशात जनावरांची कातडी मोठ्या प्रमाणात विकली जाते. हलका व्यवसाय म्हणून ह्याकडे फारसे कोणाचे लक्ष नाही. ह्यात व्यापाऱ्यांचे फावते.

म्हसवडला कच्ची कातडी पक्की करण्याचे छोटे उद्योग आहेत. त्याप्रमाणे माणदेशात प्रत्येक तालुक्यात असे कारखाने विकसित करता येतील.

माणदेशात शेतकऱ्यांची व शेतमजुरांची संख्या मोठी आहे. आज माणदेशात ५०,००० मजुर रोजगार हमीच्या कामावर आहेत. माणदेशातील शेतकरी शेकडो वर्षे निसर्गाशी झुंज देत दु:खात आणि दारिद्रयात जगत आहेत. रोजगार हमी योजनेमुळे माणदेशातील शेतमजुरांना फार मोठा लाभ झाला आहे. शेतमजुरांमध्ये त्यामुळे संघटन निर्माण झालेले दिसते. ह्यातून माणदेशात आज शेतमजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी माण तालुक्यात विजय सिन्हा व महादेव सरतापे ह्यांच्या प्रयत्नाने 'शेतमजुर संघर्ष वाहिनी' सारखी मजुरांच्या हक्कासाठी जागृत असणारी संघटना उभी राहिली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न खालीलप्रमाणे आहेत. :

१. माणदेशात दुष्काळामुळे शेतकऱ्यांना काम मिळत नाही. त्यामुळे दुष्काळातच नव्हे, तर वर्षभर रोजगार हमी योजनेमार्फत कामे चालू राहावीत.
२. मजुरीतून कोणतीही रक्कम न कापता प्रत्येक माणसाला दारोज एक किलो धान्य मिळाले पाहिजे.
३. रोजगार हमी योजनेतील सर्व भ्रष्टाचार नष्ट झाला पाहिजे.
४. पाच किलोमीटरपेक्षा लांब काम असेल, तर प्रवासाची व भत्यांची सोय शासनाने करावी.
५. मंजूर कामाची यादी काम सुरु होण्यापूर्वी तहसील कार्यालय, पंचायत समिती व प्रत्येक ग्रामपंचायत येथे दर महिन्याला लावण्यात यावी.
६. रोजगार हमी योजनेवर दोन वर्षे काम केलेल्या सुशिक्षित मुलांना शासकीय नोकऱ्यात प्राधान्य द्यावे.
७. मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी शासनाने घ्यावी.
८. मजुरांचे किमान वेतन ४० रु. धरुन दरपत्रक निश्चित करावे. प्रत्येक वर्षी मजुरीची पुर्नरचना व्हावी.

माणदेशात नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा असल्यामुळे औद्योगिक विकासाला दुसरा पर्याय नाही. पूर्वी औद्योगिक विकासाला तशी परिस्थिती नव्हती. पण आज तशी ती उपलब्ध आहे. फक्त येथे तज्ज्ञ माणसांची अडचण आहे. माणदेशात औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यातून माणसे निर्माण झाली की, त्यांना कारखाने काढण्याची प्रेरणा द्यावी, तरच टिकाऊ स्वरुपाचा औद्योगिक विकास होईल. माणदेशात कृषिपूरक उद्योगधंदे निर्माण झाले पाहिजेत.

माणदेशात प्रादेशिक सेवा केंद्र विकसित झालेले दिसत नाही. येथील लोकांना व्यापार, तंत्रसेवा, वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा ह्यांच्यासाठी सांगली, पंढरपूर, सातारा व सोलापूर ह्या शहरांवर अवलंबून रहावे लागते. आज सहा सेवा केंद्रे माणदेशात आहेत. (दहिवडी, म्हसवड,आटपाडी,सांगोले, जत व मंगळवेढा) ह्यापैकी एकाचा केंद्रीय स्थान म्हणून विकास केला पाहिजे.

माणदेशात दळणवळणाच्या सोयीकडे शासनाने म्हणावे तितके लक्ष दिलेले दिसत नाही. एस.टी.ची सोय सगळीकडे झालेली आहे. पण माणदेशातून जाणाऱ्या मिरज-लातुर नॅरोगेज रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणाचा प्रश्न सुटला पाहिजे. तसे झाल्यास वाहतूक वाढून माणदेशाच्या विकासाला चालना मिळेल.

माणदेशात प्राथमिक शिक्षणाचा विकास झाला आहे. पण माध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र इमारती नाहीत. माणदेशात प्रत्येक तालुक्यात महाविद्यालये निघाली आहेत. पण ती आर्टस्, कॉमर्सची आहेत. सायन्स कॉलेजही माणदेशात अधिक निघणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये पुरेसे साहित्य नाही. माणदेशात तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा नाहीत. त्यासाठी आय.टी.आय. सारख्या संस्था स्थापन केल्या पाहिजेत. माणदेशात कृषी, अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी झाल्या, तर माणदेशाच्या विकासाला निश्चित मदत हाईल.

माणदेशात अनेक सामाजिक प्रश्न आहेत. प्रामुख्याने अज्ञान, जातीयता, अंधश्रद्धा, भाऊबंदकी, ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न, भटक्या विमुक्त जमातींचे प्रश्न ह्यांचा त्यात अंतर्भाव आहे. आज माणदेशात ४० टक्के जनता साक्षर आहे. म्हणजे आजही ६० टक्के जनता अशिक्षित आहे. अज्ञानामुळे विकास होऊ शकत नाही. माणदेशात जातीयतेचे प्रमाण जास्त आढळते. येथे जातीय संघटना निर्माण झाल्या आहेत. तसेच अंधश्रद्धाही मोठ्या प्रमाणावर येथे जाणवते. गुप्तधनासाठी नरबळीची घटना १९८६ साली म्हसवड येथे घडली. जतच्या यल्लम्माच्या यात्रेत दरवर्षी शे-दोनशे मुली देवीला सोडल्या जातात. बिरोबाला हजारो बकरी बळी दिले जातात. अंगात येऊन नाचणाऱ्या स्त्रिया सांगोल्यासारख्या शहरात जागोजागी पहायला मिळतात. आजही माणदेशात भूत-पिशाच्य, गंडादोरा, नवस ह्यावर विश्वास असलेला दिसतो. भाऊबंदकी हा तर जुना रोग पूर्वीपासूनच माणदेशाला लागलेला आहे. जमिनीच्या वाटण्यासाठी भावाभावात भांडणे, पिढ्यान्-पिढ्या द्वेष, मत्सर जोपासलेले दिसतात. दारुच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे देशोधडीला लागली आहेत. ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न तर खूपच भयानक आहेत. अशिक्षितपणा, पुरुषाची गुलामगिरी, हुंड्याचा प्रश्न, पुरुषांची व्यसनाधीनता आणि कष्ट ह्यामुळे स्त्रियांची अवस्था फारच वाईट आहे. भटक्या

विमुक्तांची जनगणनासुद्धा अजून नीट झालेली दिसत नाही. आज एकूणच नीतिमूल्यांचा ऱ्हास वेगाने होत आहे. ही समाजाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे.

माणदेशात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे राजकीय चित्र खूपच धूसर आहेत. त्यातच माणदेश हा तीन जिल्ह्यांमध्ये विभागलेला आहे. ह्या जिल्ह्यांचे राखीव मतदार संघ हे माणदेशाच्या अविकसित प्रदेशात टाकण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यातील माण, सांगली जिल्ह्यातील जत आणि सोलापूर जिल्ह्यामधील मंढळवेढे हे तालुके राखीव आहेत. आटपाडीला स्वत:चा आमदार नाही. सांगोले हा विरोधी पक्षाकडे आहे. अनेकवेळा सवर्ण कार्यकर्ते राखीव आमदाराला विकासात्मक कार्यात साथ देत नाहीत. त्यामुळे राजकीय शक्ती निर्माण होत नाही. कोरडवाहू शेती, दुबळी आर्थिक परिस्थिती आणि राजकीय नेतृत्वाची कोंडी ह्यामुळे माणदेशातून राज्यपातळीवरील नेतृत्व निर्माण होऊ शकत नाही. ह्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन माणदेशाचे सर्व प्रश्न सोडवले पाहिजेत.

## ३.९. समारोप :

एकदंरीत, महाराष्ट्रातील इतर प्रदेशांपेक्षा माणदेश हा सर्वार्थाने वेगळा प्रदेश असल्याचे निदर्शनास येते. जुन्या काळात सतत बदलत्या राजवटीमुळे माणदेशावर अन्याय झालेला दिसतो. इ.स. १९२० नंतर माणदेशात हळूहळू परिवर्तनास सुरुवात झाली. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची चळवळ तेथे झालेली दिसते. राजकीय दृष्टिकोनातून माणदेशावर सांगोले वगळता कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व दिसून येते. माणदेशी समाजात विलक्षण एकजिनसीपणा दिसतो. तरीही बाहेरच्या समाज संस्कृतीचा परिणाम झाल्याचे निदर्शनास येते. सामाजिक जीवनात व्यापार-व्यवसायात गुंतलेला समाज (मारवाडी, लिंगायत इ.) आघाडीवर दिसतो. माणदेशी माणूस देवभोळा असल्यामुळे आजही मागासलेपण, दारिद्र्य, अंधश्रद्धा, जातीयता, भाऊबंदकी, दुष्काळ ही माणदेशाची वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवतात. सांस्कृतिक जडणघडणीत साहित्याचा हातभार मोठा असतो. माणदेशी साहित्यिकांनी माणदेशाचे परिपूर्ण चित्रण साहित्यातून केलेले जाणवते.

---- ❖ ❖ ❖ ----

## ३.१०. संदर्भ व टीपा :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पहाः इंगोले कृष्णा, | : | 'माणदेश : स्वरुप आणि समस्या', माणगंगा प्रकाशन, कमलापूर. सांगोले, प्रथमावृत्ती : इ.स. १९८८, पृ. १. |
| २. | माडगूळकर ग. दि, | : | 'गदिमा साहित्य नवनीत' प्रेस्टिज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : इ.स. १९६९, पृ. २५६. |
| ३. | पहाः कुलकर्णी एस. के., | : | 'जतेचा मंगल परिसर' (लेख), समाविष्ट : जत वाचनालय, जत स्मरणिका, जत (जि. सांगली) प्रथमावृत्ती : इ.स. १९७६, पृ. ३५. |
| ४. | पहा, मिराशी वा. वि., | : | 'संशोधन मुक्तावली', सर आठवा, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती : इ.स. १९७७, पृ. १९३. |
| ५. | पहा : Mirashi V.V., | : | 'Studies in Indology', Vol. II, P.P. 124 F. |
| ६. | पहा : कुंभार आनंद, | : | ' म्हसवड येथील कल्याण चालुक्य जगदेकमल्ल (दुसरा) यांच्या १० व्या वर्षाच्या कारकीर्दीतील शिलालेख ' (लेख), समाविष्ट : 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', वर्ष २१, जुलै ते सप्टें. १९८४, पु. ८२, पृ. २०. |
| ७. | पहाः देव शांताराम भालचंद्र, | : | ' महाराष्ट्र व गोवे शिलालेख, ताम्रपटाची वर्णनात्मक सूची', इ.स. १९८४, पृ. १११,११२. |
| ८. | पहाः आपटे दत्तोपंत (संपा.), | : | ' महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे' (राजवाडे चतुर्थ संमेलन वृत्त), पृ. ५३-५५. |
| ९. | पहाः मोडक वा. प्र., | : | 'कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास', पूर्वार्ध भाग - २ रा, आदिलशाही घराण्याचा इतिहास, इ.स. १८८२, पृ. २३. |
| १०. | | : | तत्रैव, पृ. ७२. |
| ११. | | : | तत्रैव, पृ. १७२. |
| १२. | पहाः मुजुमदार कर्वे, जोशी शं. ना., | : | 'शिवचरित्र साहित्य', खंड - ५, लेखांक ७५७ - ७५८. |

१३. पहा: बेंद्रे वा.सी., : 'छत्रपती संभाजीमहाराज', पी. पी. एच. बुक स्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७१, पृ. २६०.

१४. : तत्रैव, पृ. २६०.

१५. पहा : : Record of Shivaji Period - P. 137.

१६. पहा : पंत अप्पा, : 'मुलखावेगळा राजा', मानसन्मान प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९४०, पृ. ३.

१७. पहा : : Police Record, Home Dept. (SPL) 5, Civil disobedience movement, 1942, File No. 1110 (6)-H. (15) Letter No. 996.

१८. पहा : : Sangli District Gazettear (1969) P.1.

१९. पहा: संतकवी दासगणू, : 'श्री शंभुमहादेव अथवा श्री मांगीराम माहात्म्य सारामृत', मुंबई, १९५२, अ.१५, ओवी १०५.

२०. पहा: पंढरी संदेश, : 'श्री.समर्थ पंचायतन', दिवाळी विशेषांक, १९८४, पृ. ११.

२१. पहा: जोशी चिं. ना, : 'श्रीधर: चरित्र आणि काव्यविवेचन', मे. चि. जोशी, हैद्राबाद, प्रथमावृत्ती : १९५१, पृ. १३८.

२२. पहा: बेलसरे केशव विष्णू, : 'ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज', मुंबई, प्रकाशक य. गो. जोशी - प्रसाद प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९६१, पृ. १७.

२३. : तत्रैव, पृ. ६५९.

२४. पहा: संजीवदासमहाराज, : विनायक भानुदास मिसाळ, मुलाखत.

२५. पहा: माडगूळकर व्यंकटेश : 'प्रस्तावना', 'गावाकडच्या गोष्टी', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९५१, पृ. १०.

२६. पहा : गाडगीळ गंगाधर, : 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९६०, पृ. २५५.